कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २००९

श्री. शेख इलियास शेख अब्बास कुरेशी

मु.पो. हैदरअली चौक, शिंदखेडा, जि. धुळे

- एकूण ५.१९ हेक्टर क्षेत्र असून संपूर्ण क्षेत्राचे सेंद्रिय प्रमाणीकरण.
- सर्व सेंद्रिय निविष्ठा स्वतः तयार करुन वापरतात तसेच जैविक खते व संजीवक म्हणून दुध, ताक व व्हर्मीवाशचा वापर .
- रोग व किड नियंत्रणासाठी आंतरपिक पध्दती व पिकांचा फेरपालट तसेच पक्षी थांबे, कृत्रीम घरटी, फेरोमेन साफळे, लाईटट्रॅपचा वापर.
- जोडधंदा म्हणून पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन व शेळीपालन व्यवसाय तसेच ठिबक व तुषार सिंचनाचा वापर करुन पाण्याचा किफायतशीर वापर.
- सेंद्रिय मालाची स्थानिक बाजारात विक्री व सेंद्रिय कापसाची स्वित्झर्लंड येथे निर्यात.
- सेंद्रिय शेतीच्या प्रचार व प्रसारासाठी गावात आशापुरी शाश्वत कृषि मंडळाची स्थापना.

कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २००९

श्री. अनंत संतोषराव भोयर

मु.पो. कचारीसावंगा, ता. काटोल जि. नागपूर

- झिरो बजेट सेंद्रिय शेती संकल्पना.
- देशी पशुंसाठी विशिष्ठ पध्दतीने गोमूत्र गोळा होईल अशा रितीने गोठा बांधून गोमूत्र संकलन सुरु केले
- सोयाबीन, तूर, उडीद, मुग, ज्वारी, गहू, हरभरा, संत्रा इत्यादी पिके सेंद्रिय पध्दतीने मागील ५ ते ६ वर्षापासून घेत असून त्यासाठी शेणखत, गांडूळखत, निंबोळी पेंड, हिरवळीचे खत, निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क इत्यादीचा वापर.
- संत्र्यांमध्ये १ x २ फूटाचे चर तयार करुन संपूर्ण सेंद्रिय पध्दतीने संत्रा उत्पादन.
- रेशीम उद्योगाकरिता तुतीची कंटूरवर लागवड करुन त्याची सेंद्रिय पध्दतीने जोपासणा सुरु.

कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २००९

इन्स्टिटयुट फॉर इंटिग्रेटेड रुरल डेव्हलपमेंट (आय.आय.आर.डी.) ५४, कांचन नगर, नक्षत्रवाडी, औरंगाबाद-४३१००२

- पर्यावरण संरक्षण, सुरक्षित कृषि उत्पादन शेतक-यांसाठी प्रशिक्षण, जैवविविधता, सेंद्रिय शेती व पर्यावरण याबद्दल जागृती करणारी संस्था
- सेंद्रिय शेतीची जाणीव व जागृती कार्यक्रमाचे अंमलबजावणी करणेसाठी मराठवाडयातील आठ जिल्हयांमध्ये व भारतातील पाच राज्यामध्ये सहकारी संस्थेबरोबर काम करीत आहेत
- सेंद्रिय शेतीसाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व राज्यस्तरीय पातळीवरील चर्चासत्र/ प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन.
- सेंद्रिय शेती प्रसारासाठी महिलादिन, पृथ्वीदिन व पर्यावरण दिनाचे आयोजन.
- सहभागातून आठ जिल्हयांतील ५९५ शेतकरी गटाचे प्रमाणिकरण.